आदेश पत्र क्र. प्रस्तुत/जिल्हाधिकारी/कावि-      /२०१०
मौजा-जामठा,प.ह.न. ४२, तहसिल- नागपूर (ग्रा.)
रा.मा.क्र. १३३/एम.आर.सी-८१/
{ एम.आर.टी.पी.-२०००/बांधकाम परवानगी } /२००९-२०१०
जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर दिनांक   /   /२०१०

Application No. 7/12/15
Certified Copy of ......
Case No. 133/MRC-81/09

वाचले :-

१. अर्जदार संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. तर्फे डायरेक्टर श्री. दिलीप प्रल्हादराय अग्रवाल, राहणार- संत्रा मार्केट, नागपूर, यांचा अर्ज
२. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पूणे यांचे जा. पत्र क्र. प्रा.यो.नागपूर/ मौ. जामठा/स.क्र. १६७/२, १६८/टिपीव्ही-२/५११७, दिनांक ०६/०९/२०१०
३. सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर यांचे जा. पत्र क्र. बांध.पर./मौजा-जामठा/ता. नागपूर (ग्रा.)/ससंनाग/३५८३, दिनांक ०८/०९/२०१०
४. तहसिलदार, नागपूर (ग्रा.) यांचे पत्र क्रमांक प्रस्तु-१/तह. नाग. (ग्रा.)/कावि-६१७/२०१०, दिनांक २० ऑगस्ट, २०१०
५. मुख्य अग्निशमन अधिकारी, नागपूर महानगर पालीका, नागपूर यांचे नाहरकत प्रमाणपत्र **NO. GA/1142, 1143, 1144, 1145, 1146/F.B., Date 07/09/2080**

OFFICE OF THE COLLECTOR NAGPUR

विषय :- निवासी कारणास्तव बांधकाम नकाशास मंजूरीबाबत.
मौजा-जामठा, तालुका-नागपूर (ग्रा.), प.ह.न. ४२, येथील स.न. १६७/२, १६८ मधील निवासी प्रयोजनार्थ अकृषीक जागेच्या अभिन्यासातील ग्रुप हाऊसिंग निवासी वापराचे बांधकाम नकाशास मंजूरीबाबत.

आदेश :-

अर्जदार संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. तर्फे डायरेक्टर श्री. दिलीप प्रल्हादराय अग्रवाल, राहणार - संत्रा मार्केट, नागपूर, यांच्या अर्जान्वये मौजा- जामठा, तह. नागपूर (ग्रा.), प.ह.न. ४२, येथील स.न. १६७/२, १६८ चे निवासी वापरास्तव अकृषीक जागेमधील भुखंड क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ बांधकाम नकाशास मंजूरीकरीता अर्ज, बांधकाम सुरु केलेले नसल्याबाबत व बांधकाम परवानगी घेत असलेला भुखंड मौक्यावर पूर्णपणे मोकळा असल्याबाबत व सद्य:स्थितीत मालकी हक्क व ताबा असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, अकृषीक आदेशाची प्रत, सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर यांनी अंतिम मंजूरी शिफारस केलेल्या व सक्षम प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांनी अंतिम मंजूरी प्रदान केलेल्या अभिन्यासाची छायाप्रत, बांधकाम

नकाशाची प्रत. सादर केले असता अर्जदार यांचे अर्ज व कागदपत्रांचे आधारे प्रकरण पंजीबध्द करुन **संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पूणे, सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर, तहसिलदार, नागपूर (ग्रा.) व मुख्य अग्निशमन अधिकारी, नागपूर महानगरपालीका, नागपूर** यांचे नाहरकत प्रमाणपत्र / अभिप्राय मागविण्यात आले तसेच प्रकरणात **जाहीरनामा** प्रसिध्द करण्यात आला. **जाहीरनामा** प्रसिध्द केला असता कुणाचेही आक्षेप अथवा उजर प्राप्त झालेले नाही.

**संचालक,** नगर रचना, महाराष्ट्र राज्य **पूणे, सहा. संचालक,** नगर रचना विभाग, नागपूर, **तहसिलदार,** नागपूर (ग्रा.) व **मुख्य अग्निशमन अधिकारी,** नागपूर महानगरपालीका, नागपूर यांचा अहवाल / नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त,

**तहसिलदार, नागपूर (ग्रा.)** यांचे पत्र क्रमांक **प्रस्तु-१**/तह. **नाग.** (ग्रा.)/कावि-६१७/२०१०, दिनांक २० **ऑगस्ट, २०१०** अन्वये अहवालात नमुद केल्याप्रमाणे सदर्हु भुखंडावर बांधकाम परवानगी मिळण्यापूर्वी अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले **नाही** व भुखंड सद्य:स्थितीत संपूर्ण **मोकळा** असुन **संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. तर्फे डायरेक्टर श्री. दिलीप प्रल्हादराय अग्रवाल,** राहणार - संत्रा मार्केट, **नागपूर** यांचा **मालकी हक्क व ताबा** असल्याबाबत अहवाल प्राप्त, मुख्य अग्निशमन अधिकारी, नागपूर महानगर पालीका, नागपूर यांचे नाहरकत प्रमाणपत्र **NO. GA/1142, 1143, 1144, 1145, 1146/F.B., Date 07/09/2080** अन्वये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त, **संचालक, नगर रचना,** महाराष्ट्र राज्य पूणे यांचे जा. पत्र **क्र. प्रा.यो.नागपूर/ मौ.** जामठा/स.क्र. १६७/२, १६८/टिपीव्ही-२/५११७, दिनांक ०६/०९/२०१० अन्वये नाहरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तीसह अधिन राहुन परवानगी प्रदान करण्यास हरकत नसल्याचे नमुद केलेले आहे. तसेच **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचे जा. पत्र क्र. अकृषक/मौजा-जामठा/ता. नागपूर (ग्रा.)/ससंनाग/३५८३, दिनांक ०८/०९/२०१० अन्वये मौजा - **जामठा,** तह. नागपूर (ग्रा.), प.ह.न. ४२, येथील स.न. १६७/२, १६८ च्या **निवासी** वापरास्तव अकृषक जागेवर खालील विवरणपत्रानुसार **ग्रुप हाऊसिंग निवासी** वापराचे **निवासी** बांधकाम करण्याकरीता **बांधकाम नकाशास** खालील अटींचे अधिन राहून शिफारस केलेली आहे.

## AREA STAEMENT OF BUILT UP AREA :

| BULDING NOS | CATEGORY | TYPE | BUIT UP AREA | NOS. OF BUILDING/ PARTS | TOTAL BUILT AREA |
|---|---|---|---|---|---|
| **BUNGALOW** | | | | | |
| 1) SD 1 TO 36, 38 TO 91 | TYPE -A | SD - TYPE | 118.954 SQ.M. | 90 | 10705.860 SQ.M. |
| 2) D 37 | | D - TYPE | 121.143 SQ.M. | 1 | 121.143 SQ.M. |
| **ROW HOUSE** | | | | | |
| 1) R 2 TO 5, 8, 9, 12, 13, 16 TO 19, 22 TO 25, 28, 29, 32, 33, 36 TO 39, 42 TO 44, 47 TO 51, 54 TO 57, 60, 63 TO 65, 68 TO 71 | TYPE -B | R - TYPE | 97.767 SQ.M. | 44 | 4301.748 SQ.M. |
| 2) R 1, 6, 7, 10, 11, 14, 15, 20, 21, 26, 27, 30, 31, 34, 35, 40, 41, 45, 46, 52, 53, 58, 59, 61, 62, 66, 67, 72 | | R - TYPE | 99.217 SQ.M. | 28 | 2778.076 SQ.M. |
| FLAT BULDING NO 1 | TYPE -C | 2 - BHK | 3289.183 SQ.M. | 2 | 6578.366 SQ.M. |
| | TYPE -D | 2 - BHK | 2229.678 SQ.M. | 4 | 8918.712 SQ.M. |
| FLAT BULDING NO 2 | TYPE -C | 2 - BHK | 3289.183 SQ.M. | 1 | 3289.183 SQ.M. |
| FLAT BULDING NO 3 | TYPE -D | 2 - BHK | 2229.678 SQ.M. | 4 | 8918.712 SQ.M. |
| FLAT BULDING NO 4 | TYPE -E | 1 - BHK | 1526.222 SQ.M. | 3 | 4578.666 SQ.M. |
| FLAT BULDING NO 5 | TYPE -F | 3 - BHK | 2171.044 SQ.M. | 1 | 2171.044 SQ.M. |
| | | **TOTAL BUILT UP AREA** | | | **52361.51 SQ.M.** |

प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाचे आदेश पत्र क्र.प्रस्तु/ जिल्हाधिकारी/काथि-६७/२०१०, रा.मा.क्र. ३३८/एन.ए.पी-३४/२००९-२०१०, दिनांक १४/०१/२०१० अन्वये **निवासी** वापरास अकृषिक परवानगी प्रदान करण्यात आली असून या अभिन्यासातील भुखंडावर करण्यात येणाऱ्या बांधकामास या आदेशातील **अटी व शर्ती** बंधनकारक राहील तसेच **सुधारित आदेश** पत्र क्र.प्रस्तु/ जिल्हाधिकारी/काथि-१६५०/२०१०, रा.मा.क्र. ३३८/एन.ए.पी-३४/२००९-२०१०, दिनांक २७/०८/२०१० मधील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

वरील बाबी विचारात घेता अर्जदार यांनी सादर केलेले **निवासी** वापराचे **बांधकाम नकाशा** मंजूर करण्यास हरकत नाही. म्हणून **महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६** चे कलम १८ व त्याखालील नियमानुसार **जिल्हाधिकारी, नागपूर** यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन मौजा- **जामठा** तालुका-

नागपूर (ग्रा.), प.ह.न. ४२, स.न. १६७/२, १६८ च्या निवासी वापरास्तव अकृषीक जागेमधील खालील विवरणपत्रानुसार ग्रुप हाऊसिंग निवासी वापराचे निवासी बांधकाम करण्याकरीता बांधकाम नकाशास खालील अटी व शर्तीस अधिन राहुन मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

## AREA STAEMENT OF BUILT UP AREA :

| BULDING NOS | CATEGORY | TYPE | BUIT UP AREA | NOS. OF BUILDING/ PARTS | TOTAL BUILT AREA |
|---|---|---|---|---|---|
| **BUNGALOW** | | | | | |
| 1) SD 1 TO 36, 38 TO 91 | TYPE -A | SD - TYPE | 118.954 SQ.M. | 90 | 10705.860 SQ.M. |
| 2) D 37 | | D - TYPE | 121.143 SQ.M. | 1 | 121.143 SQ.M. |
| **ROW HOUSE** | | | | | |
| 1) R 2 TO 5, 8, 9, 12, 13, 16 TO 19, 22 TO 25, 28, 29, 32, 33, 36 TO 39, 42 TO 44, 47 TO 51, 54 TO 57, 60, 63 TO 65, 68 TO 71 | TYPE -B | R - TYPE | 97.767 SQ.M. | 44 | 4301.748 SQ.M. |
| 2) R 1, 6, 7, 10, 11, 14, 15, 20, 21, 26, 27, 30, 31, 34, 35, 40, 41, 45, 46, 52, 53, 58, 59, 61, 62, 66, 67, 72 | | R - TYPE | 99.217 SQ.M. | 28 | 2778.076 SQ.M. |
| FLAT BULDING NO 1 | TYPE -C | 2 - BHK | 3289.183 SQ.M. | 2 | 6578.366 SQ.M. |
| | TYPE -D | 2 - BHK | 2229.678 SQ.M. | 4 | 8918.712 SQ.M. |
| FLAT BULDING NO 2 | TYPE -C | 2 - BHK | 3289.183 SQ.M. | 1 | 3289.183 SQ.M. |
| FLAT BULDING NO 3 | TYPE -D | 2 - BHK | 2229.678 SQ.M. | 4 | 8918.712 SQ.M. |
| FLAT BULDING NO 4 | TYPE -E | 1 - BHK | 1526.222 SQ.M. | 3 | 4578.666 SQ.M. |
| FLAT BULDING NO 5 | TYPE -F | 3 - BHK | 2171.044 SQ.M. | 1 | 2171.044 SQ.M. |
| | | **TOTAL BUILT UP AREA** | | | **52361.51 SQ.M.** |

## बांधकाम आराखडे मंजूर करावयाच्या जमीनीचे वर्णन

| गावाचे नांव | तालुका | स.न. | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| जामठा | नागपूर (ग्रा.) | १६७/२, १६८ | TYPE – A<br>TYPE – B<br>TYPE – C<br>TYPE – D<br>TYPE – C<br>TYPE – D<br>TYPE – E<br>TYPE – F | भुखंडाखालील एकुण क्षेत्र-८३३९८.६३ चौ.मी.,<br>प्रस्तावाखालील क्षेत्र - ५२३६१.५१ चौ.मी.,<br>परवानगी क्षेत्र - ५२३६१.५१ चौ.मी.,<br>रहिवासी वापराचे क्षेत्र - ५२३६१.५१ चौ.मी., |

अटी व शर्ती :-

१) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला या कार्यालयाचे आदेश पत्र क्र.प्रस्तु/ जिल्हाधिकारी/कावि-६७/२०१०, रा.मा.क्र. ३१८/एन.ए.पी-३४/२००९-२०१०, दिनांक १४/०१/२०१० अन्वये **निवासी** वापरास अकृषिक परवानगी प्रदान करण्यात आली असून या अभिन्यासातील भुखंडावर करण्यात येणाऱ्या बांधकामास या आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक राहील तसेच **सुधारित आदेश** पत्र क्र.प्रस्तु/ जिल्हाधिकारी/कावि-१६५०/२०१०, रा.मा.क्र. ३१८/एन.ए.पी-३४/२००९-२०१०, दिनांक २७/०८/२०१० मधील अटी व शर्ती बंधनकारक राहील.

२) या बांधकाम परवान्याची मुदत आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाची आहे. या कालावधीत बांधकाम पूर्ण न झाल्यास मुदत संपण्यापूर्वी या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यात यावे. नुतनीकरण प्रत्येक वर्षाची मुदत संपण्यापूर्वी मुदतवाढ घेवून तीन वर्षा पर्यंत मंजूर करता येईल.

३) बांधकाम सुरु करण्यात येत असल्याबाबतची सुचना **सहा. संचालक, नगररचना विभाग, नागपूर** यांचे कार्यालयास विहीत नमुन्यात (**Appendix "F" मध्ये**) देण्यात यावी.

४) जोत्या पर्यंत (**Plinth Level**) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर याबाबतची माहिती विहीत नमुन्यात (**Appendix "G" मध्ये) सहा. संचालक, नगर रचना, नागपूर** यांचे कार्यालयास देण्यात यावी. याप्रमाणे सदर कामास नगर रचना कार्यालयाने विहीत नमुन्यात (**Appendix "H" मध्ये**) प्रमाणित केल्यानंतर पुढील काम सुरु करण्यात यावे.

५) उपयोगिता प्रमाणपत्र **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर (Occupancy Certific**
यांचे मंजूरी शिवाय नविन ईमारत किंवा ईमारतीचा कोणताही हिस्स्याचा उपभोग करण्यास किंवा उपभ
करण्याची मंजुरी कोणत्याही व्यक्तीला वापर करण्याचा परवाना देता येणार नाही. तसे केल्या
अनधिकृत उपभोग केल्याबाबत अर्जदार आणि वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) हे गुन्हयास पात्र ठरतील
उपयोगीता प्रमाणपत्राकरीता ईमारत मालक व वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) यांनी (**Appendix "J**
**मध्ये)** बांधकाम पूर्ण झाल्याच्या नकाशाच्या तीन प्रतीसह अर्ज **सहा. संचालक, नगर रचना विभाग**
**नागपूर** यांचेकडे सादर करावा.

६) मंजूर नकाशात दर्शविलेल्या वापराकरीताच ईमारतीचा उपयोग करण्यात यावा.

७) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजीत बांधकामापासून पुढील, मागील व बाजूचे अंत
प्रत्यक्षात जागेवर कायम ठेवणे आवश्यक असुन सदर जागा कायम खुली ठेवावी.

८) नियोजीत ईमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाचं
व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहिजे.

९) नियोजीत बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे असावी यापेक्षा जास्त असू नये.

१०) नियोजीत बांधकाम मंजूरीपेक्षा जास्त वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाच
असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

११) जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजूरी घेतल्याशिवाय मंजूर बांधकाम नकाशा विरुध्द बांधकाम करण्यात
येवू नये. मंजूर बांधकाम नकाशाविरुध्द कोणतेही बांधकाम केल्यास ते अनधिकृत गृहीत धरण्यात येईल
याची नोंद घ्यावी. अनधिकृत बांधकाम केल्यास **महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६**
नुसार जमिन मालक / विकासकर्ता व वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट) गुन्हयास पात्र ठरतील.

१२) नागपूर महानगरपालिकेकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक संपूर्ण सॅनिटरी काय
पूर्ण करण्यात यावे.

१३) सिव्हर लाईनला पावसाच्या पाण्याची पाईप लाईन जोडण्यात येवू नये आणि त्याकरीता विकासकर्त्यान
स्वतंत्र व्यवस्था करावी.

१४) **जिल्हाधिकारी** किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा **नगर रचना अधिकारी** यांचे पडताळणी करीता ईमारत
बांधकाम सुरु असतांना मंजूर बांधकाम नकाशा नेहमी बांधकामाचे ठिकाणी उपलब्ध ठेवावेत.

१५) नागपूर शहराकरीता लागू विकास नियंत्रण नियमावली संपूर्ण विकासकर्त्यास बंधनकारक राहतील.

१६) भुखंड पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (**RAIN WATER HARVERSTING**) ची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

१७) भुखंडावरील रिकाम्या जागेत विकासकर्त्याने नियमावलीनुसार किमान आवश्यक झाडे लावावी व ती झाडे मोठी होईपर्यंत त्यांचे संगोपन करावे.

१८) पाण्याची आणि सिव्हेज डिस्पोजलची व्यवस्था विकासकर्त्याने स्वतः करावी लागेल.

१९) भुखंडाच्या कडेला योग्य आकाराच्या व रस्त्यापासून जवळ असेल अशा कचऱ्यांच्या टोपल्यांची व्यवस्था विकासकर्त्यास करावी लागेल.

२०) तळमजल्यावर योग्य पत्र पेटीची व्यवस्था करावी.

२१) जर नकाशात दर्शविलेल्या गणणपत्रकात / आकडेमोड (कॅलक्युलेशन्स) मध्ये विकास नियंत्रण नियमावतीली तरतुदीशी विसंगत अशी चुक / दोष आढळ्यास, ईमारतीचा / बांधकामाचा तो भाग जो बसत नाही तो अनधिकृत ग्राह्य धरल्या जाईल. याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर जो निर्णय घेतील तो निर्णय अंतिम राहील.

२२) समास अंतरामध्ये असलेले विद्यमान बांधकाम पाडण्यात यावे. हा परवाना कोणतेही अस्तित्वातील बांधकाम जे जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेले नाही असे बांधकाम मंजूर करणार नाही.

२३) बांधकामाच्या साहित्याची अशा तऱ्हेने व्यवस्था करावी जेणे करुन त्यामुळे ड्रेन, पावसाचे पाणी व वाहतुक इत्यादींना अडथळा निर्माण होणार नाही. त्यामुळे अडथळा निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी यांचे तर्फे कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

२४) बांधकाम परवानगी करीता सादर केलेल्या मालकी हक्क व इतर कागदपत्रांमध्ये काही दोष असल्यास अथवा सदरची कागदपत्रे खोटी व दिशाभुल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

२५) स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी (**Structurail Stability**) संबंधी सक्षम स्थापत्य अभियंत्याचे प्रमाणपत्र एक महिन्याचे कालावधीत **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचेकडे सादर करावे.

२६) नकाशे व आराखडे तयार करुन आराखडयानुसार सक्षम अभियंत्याचे देखरेखीखाली बांधकाम पूर्ण करुन घेण्याची व त्याप्रमाणे बांधकाम हे **भारतीय मानक संस्थेने (N.B.S.S)** विहीत केलेल्या

तरतुदीनुसार पूर्ण करुन घेण्याबाबत सक्षम स्थापत्य अभियंत्याचा वास्तुशास्त्रज्ञाचा दाखल प्राप्त करून **घ्यावा.**

२७) उक्त वापराचे अनुषंगाने सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा अर्जदार यांना स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

२८) नियोजीत बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालकाने घेतली पाहिजे.

२९) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर **सहा. संचालक, नगर रचना** यांचे तपासणी अंती बांधकाम पूर्णत्वाचा दाखला **मा. जिल्हाधिकारी, नागपूर** यांचेकडून घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३०) नियोजीत बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहीवाटीचा हक्कांचा भंग होणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी आवेदक यांचेवर राहील.

३१) अर्जदारास **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचेकडे नियमानुसार आकारण्यात येणारे शुल्क खजिना दाखल करणे बंधनकारक राहील.

३१) १५.०० मिटर पेक्षा जास्त उच्च इमारतींना आवश्यक असणाऱ्या अग्नी प्रतिबंधक सुविधा व प्रतिबंध विषयक उपकरणे **अग्नीशमन विभाग, नागपूर महानगर पालीका,** नागपूर यांचे निर्देशप्रमाणे व त्यांचे नाहरकत प्रमाणपत्रात नमुद असलेल्या सर्व अटी व शर्तीप्रमाणे स्वखर्चाने पुरविणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

३२) १५.०० मिटर पेक्षा जास्त उंच इमारतीच्या नियोजनातील जिन्याच, लिफ्टचे स्थानमानात मंजूरी प्राप्त होतांना बदल सुचविण्यात आले असल्यास ईमारतीतील नियोजनात बदल करणे आवश्यक राहील.

३३) नेहमीच्या पाणी वापराशिवाय, अग्निप्रतीबंधक व्यवस्थेकरीता पाणी पुरवठा, जलनिस्तारण, सांडपाणी, कचरा विल्हेवाट इत्यादी बाबींची पुर्तता अर्जदारास स्वखर्चाने स्वजबाबदारीवर करणे बंधनकारक राहील.

३४) प्रस्तावित बांधकाम क्षेत्र २०००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने केन्द्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाचे धोरणानुसार पर्यावरण विभागाचे **Environmental Clearance** प्रमाणपत्र अर्जदार यांना स्वतंत्ररित्या सहा महिन्याचे आंत प्राप्त करणे बंधनकारक राहील. तसेच नाहरकत प्रमाणपत्रातील अटी, शर्ती व निर्देश यांचे पालन करणे अर्जदार यांना बंधनकारक राहील. पर्यावरण विभागाचे

**Environmental Clearance** प्रमाणपत्राशिवाय सहाय्यक दुय्यम निबंधक / दुय्यम निबंधक यांनी सदहु सदानिकांची **खरेदी - विक्री** नोंदी रुजू करण्यात येवू नये.

३५) विकासकाने जोत्यापर्यंतचे बांधकाम झाल्यानंतर Plinth Checking चे प्रमाणपत्र संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून घेणे बंधनकारक राहील.

३६) **"अ"** वर्ग नगर परिषदेच्या विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. १८.१ नुसार लिफ्टची सुविधा कायमस्वरुपी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

३६) प्रस्तुत परवानगी मिळणेकामी अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्रे व माहिती ही दिशाभुल करणारी अगर चुकीची आढळून आल्यास त्यास परवानगी धारकास जबाबदार धरुन **भारतीय दंड विधान संहितेच्या** तरतुदीनुसार फौजदारी कारवाईस पात्र धरण्यात येईल.

३७) उपरोक्त अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचा अगर शर्तीचा भंग केल्यास सदरचा परवानगी आदेश रद्द समजण्यात येईल.

OFFICE OF THE COLLECTOR NAGPUR

जिल्हाधिकारी, नागपूर

प्रति,

संदेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.ली. तर्फे डायरेक्टर
श्री. दिलीप प्रल्हादराय अग्रवाल,
राहणार- संत्रा मार्केट, नागपूर,प्रत.

१. सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर
२. उपविभागीय अधिकारी, नागपूर
३. तहसिलदार, नागपूर (ग्रा.)
४. सचिव, ग्राम पंचायत, जामठा
५. तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, नागपूर (ग्रा.)
६. सहाय्यक दुय्यम निबंधक, नागपूर (ग्रा.)

TRUE COPY
Head Copyist
Collectorate Nagpur

जिल्हाधिकारी, नागपूर

Date of Application 29/6/15
Told to appear on 8/7/15
Date of appearance 8/7/15
Copy ready on
Copy delivered on 8/7/15
Cost of Copy 8/7/15
Copied by Compared by Head Copyist
Collectorate Nagpur

Received Rs 75 in Word
Rupees Seventy Five
as fee for this certified copy
8/7/15 Head Copyist
Collectorate Nagpur